# जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे यांचे कार्यालय

पत्ता-१. जिल्हा निवडणूक शाखा, तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे,प.४०० ६०१
दुरध्वनी क्र-०२२-२५४५४१४२, फॅक्स नंबर ०२२-२५३४२१२ Website-www.thaneelection.com

अत्यंत तातडीचे निवडणूक प्राथम्य.  क्र. सामान्य/कक्ष-१/टे-४/पद.नि./कावि-१०/२०१७
दि.२४ /१०/२०१७

प्रति,
१.मा. आयुक्त ------महानगरपालिका (सर्व)
२.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ,ठाणे
३..मत.नोंदणी अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी
कोकण पदवीधर मतदार संघ . ---------(सर्व) विधानसभा मतदार संघ
४. तहसिलदार---------(सर्व)
५.मुख्याधिकारी ----------
नगरपालिका (सर्व)
६.नगरपंचायत (सर्व)
७.पंचायत समिती कार्यालय (सर्व)

विषय :- दि.१/११/२०७ या अर्हता दिनांकावर (Qualifying Date)आधारित कोकण विभाग पदवीधर मतदार संघाच्या मतदार यादया तयार करण्याचा कार्यक्रम
मतदार नोंदणी अधिनियम,१९६० च्या कलम ३१(४) अन्वये नोटीसीची द्वितीय पुर्नप्रसिध्दी करणेबाबत

संदर्भ :- विभागिय आयुक्त , कोकण विभाग तथा मतदार नोंदणी अधिकारी , कोकण विभाग यांचेकडिल पत्र क्र.साशा/कार्या-७/निवडणूक/सीआर डीयू/२०१७,दि.१२/१०/२०१७

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये दि.१/११/२०१७ या अर्हता दिनांकावर (Qualifying Date)आधारित कोकण विभाग पदवीधर मतदार संघाच्या मतदार यादया तयार करण्याच्या कार्यक्रमाचे वेळापत्रकानुसार मतदार नोंदणी अधिनियम,१९६० चे कलम३१(४) अन्वये मराठी/इंग्रजी नोटीसीची प्रत या सोबत जोडली असून सदर नोटिसीची द्वितीय पुर्नप्रसिध्दी प्रसिध्दी **आपले कार्यालयास दि.२५/१०/२०१७ रोजी** प्रसिध्द करुन प्रसिध्दीचा अहवाल त्याच दिवशी या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

सोबत परिशिष्ट अ-१ (मराठी/इंग्रजी )

जिल्हाधिकारी व
जिल्हा निवडणूक अधिकारी ठाणे करिता

परिशिष्ट- अ १

## भारत निवडणूक आयोग

महाराष्ट्र विधान परिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदार संघाची मतदार यादी तयार करणे

मतदार नोंदणी नियम, १९६० चा नियम ३१ (४) प्रमाणे नोटीस

मतदार नोंदणी नियम, १९६० च्या नियम ३१(४) नुसार कोकण विभाग पदवीधर मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी, हे त्यांच्या दि. २८ सप्टेंबर, २०१७ च्या नोटीस नुसार वर उल्लेखित पदवीधर मतदार संघाचे यादीत नाव नोंदणी करण्यासाठी पात्र असलेल्या प्रत्येक व्यक्तीस असे आवाहन करतात की, मतदार नोंदणी नियम, १९६० याला जोडलेला आणि दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ ला 1. ठाणे वैभव व 2. लोकमत या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या नोटीस मधील परिशिष्ट दोन मध्ये दिलेला नमुना १८ मधील अर्ज दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यापुर्वी कार्यालयीन वेळेत विभागीय आयुक्त, कोकण विभाग तथा मतदार नोंदणी अधिकारी, कोकण विभाग पदवीधर मतदार संघ / वर उल्लेखित पदवीधर मतदार संघातील सर्व जिल्हाधिकारी तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी / पदनिर्देशित अधिकारी यांचे कार्यालयात या मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी त्याने / तिने पाठवावा किंवा पोहचवावा.

वर उल्लेखित व्यक्तींनी, त्यांनी जर अदयाप त्यांची नावे मतदार यादीत नोंदविलेली नसतील तर त्यांनी नमुना १८ मधील त्यांचे अर्ज दि. ६ नोव्हेंबर, २०१७ रोजी अथवा त्यापुर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

या संदर्भात सर्व माहिती मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या www.ceo.maharashtra.gov.in या वेबसाईटवर सुध्दा उपलब्ध आहे.

(डॉ.जगदीश पाटील)
विभागीय आयुक्त, कोकण विभाग
तथा मतदार नोंदणी अधिकारी,
कोकण विभाग पदवीधर मतदार संघ